**भोगवटादार वर्ग-२ अथवा भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनी कर्ज उभारणीसाठी वित्तीय संस्थेकडे गहाण/तारण ठेवण्यास परवानगी देणे आणि तारण शुल्क (Mortgage Fee) आकारणी करण्याबाबत मार्गदर्शन सूचना.**

# महाराष्ट्र शासन

## महसूल विभाग

**शासन परिपत्रक क्र. जमीन-०२/२०१४/प्र.क्र.४५/ज-१ (ई-१३६८९६२)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १९ ऑक्टोबर, २०२६.

**वाचा** :-१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांकः जमीन-२०००/प्र.क्र.१३५/ज-१, दि.२७.०२.२००९.
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन-११/२०११/प्र.क्र.१६६/ज-१, दि.०२.०१.२०१२
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांकः जमीन-२०१५/प्र.क्र.१५५/ज-१, दि.१६.०६.२०१६.
४. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांकः जमीन-०२/२०१४/प्र.क्र.४५/ज-१, दि.२५.०५.२०१७.
५. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांकः जमीन-०२/२०१४/प्र.क्र.४५/ज-१, दि. २६.०६.२०१८.
६. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. न्यायाप्र-२०२४/प्र.क्र.२१६/ज-१,दि.२३.१०.२०२४
७. महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक ३१ डिसेंबर, २०२५.

**प्रस्तावना:-**

भोगवटादार वर्ग-२ अथवा भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींवर वित्तीय संस्थांकडून शैक्षणिक, वैद्यकिय, सांस्कृतिक, सामाजिक, उच्च व तंत्रशिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, निवासी प्रयोजन/ सहकारी गृहनिर्माण संस्था या प्रयोजनासाठी तसेच औद्योगिक व वाणिज्यिक प्रयोजनासाठी कर्ज घेण्यासाठी परवानगी देण्याबाबत आणि त्यासोबत अनुक्रमे ०.२५% व ०.५०% इतके तारण शुल्क (Mortgage Fee) आकारण्याबाबत सर्वसमावेशक संदर्भीय क्र.१ ते ५ येथील शासन निर्णयान्वये धोरण निश्चित करण्यात आले होते.

सदर तारण शुल्क आकारणीच्या वैधतेस मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ४०८६/२०११ (मे. बिल्ट ग्राफिक्स पेपर प्रॉडक्ट लि. विरुद्ध महाराष्ट्र शासन) अन्वये आव्हान देण्यात आले. प्रस्तुत प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने दि.२९.०८.२०२२ रोजीच्या आदेशान्वये तारण शुल्क/ गहाण शुल्क

घेणेबाबत स्पष्ट वैधानिक तरतूद नसल्याच्या कारणावरून संदर्भीय दिनांक २७.०२.२००९ चा शासन निर्णय व तारण शुल्क आकारणीचे आदेश रद्द ठरविले.

सदर बाब विचारात घेता आणि दि.२७ फेब्रुवारी, २००९ पासून आकारण्यात आलेल्या व वसूल करण्यात आलेल्या तारण शुल्काला कायदेशीर संरक्षण (Validation) देण्यासाठी, महाराष्ट्र विधानमंडळाने संमत केलेला आणि मा. राज्यपालांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी संमती दिलेला "महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२५" (सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२) दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे. या अधिनियमाद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये आवश्यक सुधारणा करून दि.२७ फेब्रुवारी, २००९ पासून आकारण्यात आलेल्या व वसूल करण्यात आलेले तारण शुल्क वैध करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन यापूर्वी तारण शुल्क आकारणी व वसुलीबाबत निर्गमित करण्यात आलेले सर्व संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रके अधिक्रमित करून मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६ च्या पोट-कलम (४) मध्ये पुढीलप्रमाणे सुधारित तरतूद करण्यात आली आहे:-

*(४) पोटकलम (१) मध्ये किंवा या संहितेच्या इतर कोणत्याही उपबंधांमध्ये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, भोगवटादार वर्ग दोन याने, भूमी सुधारणा कर्ज अधिनियम, १८८३, शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १८८४ किंवा मुंबईचा बिगर शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९२८ या अन्वये राज्यशासनाने त्यास दिलेल्या कर्जाबद्दल राज्यशासनाच्या नावाने किंवा सहकारी संस्थेने (किंवा भारताच्या स्टेट बँकेबाबत अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ अन्वये प्रस्थापित केलेल्या भारताच्या स्टेट बँकेने किंवा बँकांच्या व्यवहार करणाऱ्या कंपन्यांबाबत (उपक्रम संपादन करणे आणि हस्तांतरण) अधिनियम, १९७० याचे कलम २ खंड (ड) च्या अर्थानुसार, तत्सम नवीन बँकेने किंवा संबंधित कायद्यान्वये प्रस्थापित केलेल्या महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने त्यास कर्जाबद्दल उक्त सहकारी संस्थेच्या नावाने भारताची स्टेट बँक, तत्सम नवीन बँक किंवा यथास्थिती, [ किंवा बँकांच्या व्यवहार करणाऱ्या कंपन्यांबाबत*

*(उपक्रम संपादन करणे आणि हस्तांतरण) अधिनियम, १९८० याच्या कलम २ च्या खंड (ब) च्या अर्थानुसार तत्सम नवी बँक किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ] यांच्या नावाने आपली मालमत्ता गहाण ठेवणे कायदेशीर असेल आणि असे कर्ज ज्या अटीवर देण्यात आले असेल त्या अटीनुसार अशी कर्जाची परतफेड करण्यात अशा भोगवटादाराने कसूर केल्यास, राज्यशासनास किंवा सहकारी संस्थेस, भारताच्या स्टेट बँकेस तत्सम नवीन बँकेस किंवा यथास्थिती महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळास] जी इतर कोणतीही उपाययोजना करता येईल त्यास बाध न आणता राज्यशासनाने किंवा [ यथास्थिती, सहकारी संस्थेने, भारताच्या स्टेट बँकेने, तत्सम नवीन बँकेने किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने ] वहिवाट जप्त करवून तिची विक्री करविणे आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न अशा कर्जाच्या फेडीसाठी वापरणे हे कायदेशीर असेल.*

*जिल्हाधिकाऱ्यास, सहकारी संस्था, भारताची स्टेट बँक, तत्सम नवीन बँक किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांच्या अर्जावरून आणि राज्यशासनाने याबाबतीत विहित केलेले पट्टामूल्य (प्रिमियम) देण्यात आल्यावर, लेखी आदेशाद्वारे, भोगवटादाराचे, भोगवटादार वर्ग एक म्हणून पुन्हा वर्गीकरण करता येईल आणि अशा रीतीने पुन्हा वर्गीकरण करण्यात आल्यावर भोगवटादार, या संहितेखालील हस्तांतरणानुसार, कोणत्याही निर्बंधरहित अशा जमिनीची विल्हेवाट धारण करील.*

*[परंतु भोगवटादार, भोगवटादार वर्ग दोन, शेतीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी, त्याची मालमत्ता, सहकारी संस्थेच्या, भारतीय स्टेट बँकेच्या, तत्सम नवीन बँकेच्या किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या नावे गहाण ठेवण्यापूर्वी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, शासन विनिर्दिष्ट करील अशा दराने, शासनास गहाण शुल्क प्रदान करील.]*

स्पष्टीकरण : *या कलमाच्या प्रयोजनांकरिता 'अनुसूचित जमाती' म्हणजे भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येतात अशा जमाती किंवा वन्य जमाती किंवा अशा जमातींचे किंवा वन्य*

*जमातींचे भाग, किंवा त्यामधील गट आणि जमातीची किंवा वन्य जमातीची किंवा उक्त अनुच्छेद ३४२ [अन्वये केलेल्या आदेशाच्या अनुसूचीच्या भाग सात-अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमातीच्या किंवा वन्य जमातीच्या भागाची किंवा त्यामधील गटाची परंतु, त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या वस्त्यांमध्ये न राहणारी तरीही या कलमाच्या आणि कलम ३६-अ च्या संरक्षणाची जिला गरज आहे (आणि त्यांना अशा संरक्षणाची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे) अशा व्यक्तीशी त्या कलमाच्या प्रयोजनांसाठी अनुसूचीत जमातीच्या व्यक्तीशी ज्या रीतीने व्यवहार करण्यात येतो त्याच रीतीने व्यवहार करण्यात येईल.]*

विधिग्राह्मीकरण.- *उक्त संहितेमध्ये किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमांमध्ये अथवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, सहकारी संस्थेने, भारतीय स्टेट बँकेने, तत्सम नवीन बँकेने, किंवा यथास्थिति, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने भोगवटादार वर्ग-दोनला, आगाऊ स्वरूपात दिलेल्या कर्जाच्या मोबदल्यात, त्याने अशा सहकारी संस्थेच्या किंवा भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तत्सम नवीन बँकेच्या किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या नावे, शेतीव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी, त्याची मालमत्ता गहाण ठेवल्याबद्दल, त्याच्याकडून २७ फेब्रुवारी, २००९ पासून सुरू होणाऱ्या आणि महाराष्ट्र जमीन महसूल (दुसरी सुधारणा व विधिग्राह्मीकरण) संहिता, २०२५ (२०२५ चा महा. ६२) याच्या प्रारंभाच्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीत शासनाने किंवा कोणत्याही महसूल (दुसरी सुधारणा व विधिग्राह्मीकरण) संहिता, २०२५ (२०२५चा महा. ६२) द्वारे सुधारणा केलेल्या उक्त संहितेअन्वये, वैधपणे आकारण्यात, मागणी करण्यात, वसूल करण्यात किंवा घेण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि नेहमीकरिता वैधपणे आकारण्यात, मागणी करण्यात, वसूल करण्यात किंवा घेण्यात आली असल्याचे मानण्यात येईल; आणि त्यानुसार,*

*(एक) अशा प्रारंभाच्यापूर्वी, उक्त संहितेच्या तरतुदींमध्ये, शासनाने अशा गहाण शुल्काच्या आकारणीसाठी, मागणीसाठी व वसुलीसाठी किंवा कारवाईसाठी तरतूद केलेली*

*नव्हती या कारणावरून, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणासमोर किंवा अन्य प्राधिकरणासमोर कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही; आणि*

*(दोन) २७ फेब्रुवारी २००९ पासून अशा प्रकारे आकारणी केलेल्या, मागणी केलेल्या व वसूल केलेल्या, अशा कोणत्याही गहाण शुल्काच्या परताव्यासाठी किंवा केलेल्या कोणत्याही कारवाईसाठी कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणासमोर किंवा अन्य प्राधिकरणासमोर कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही किंवा चालविण्यात येणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही.*

०२. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२५ मधील तरतुदींच्या अनुषंगाने, तारण शुल्क आकारणीबाबत सर्व क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

*१. दि.२७ फेब्रुवारी २००९ पासून महसूल विभागाच्या आदेशान्वये किंवा शासन निर्णयान्वये आकारण्यात आलेले, मागणी केलेले आणि वसूल केलेले सर्व गहाण/तारण शुल्क हे 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२५' द्वारे सुधारणा केलेल्या संहितेअन्वये वैधपणे आकारण्यात व वसूल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.*

**२.** *भोगवटादार वर्ग-२ अथवा भाडेपट्ट्याने* निवासी, औद्योगिक, धर्मादाय, वाणिज्यिक व इतर कोणत्याही प्रयोजनासाठी प्रदान केलेल्या शासकीय / नझूल *जमिनी व* त्यावरील इमारतीमधील सदनिका/गाळा कर्ज उभारणीसाठी वित्तीय संस्थांकडे गहाण/तारण ठेवण्यास संबंधित जिल्हाधिकारी यांनी पूर्व परवानगी देताना, खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार विविध प्रयोजनासाठी तारण शुल्क आकारणी करावी:-

| *अ.क्र.* | **जमीन मंजुरीचे *प्रयोजन*** | ***आकारावयाचे तारण शुल्क*** |
|---|---|---|
| *१.* | *निवासी, शैक्षणिक, वैद्यकीय, सांस्कृतिक, सामाजिक, उच्च व तंत्रशिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, प्रयोजन/सहकारी गृहनिर्माण संस्था या प्रयोजनासाठी जमीन अथवा निवासी प्रयोजनाकरीता सदनिका/गाळा* | **०.२५** |
| *२.* | *औद्योगिक व वाणिज्यिक प्रयोजनांसाठी जमीन अथवा त्यावरील इमारत/ गाळा* | ***०.५०*** |

उक्त प्रमाणे *तारण शुल्क आकारण्याची व वसूल करण्याची कार्यवाही दि.३१ डिसेंबर, २०२५ नंतर पूर्णपणे वैधानिक व बंधनकारक राहील.*

**०३**. व्यक्ती व संस्था यांना निवासी, औद्योगिक, धर्मादाय, वाणिज्यिक व इतर कोणत्याही प्रयोजनासाठी प्रदान केलेल्या शासकीय/ नझूल जमिनीवरील इमारतीमधील सदनिका/गाळा तारण ठेवतांना सक्षम प्राधिका-याची पूर्वपरवानगी न घेता तारण व्यवहार केल्यास असा तारण व्यवहार नियमानुकूल करतांना उक्त तक्त्यात नमूद तारण शुल्काच्या "दुप्पट शुल्क" आकारून जिल्हाधिकारी असा विनापरवाना तारण व्यवहार नियमित करु शकतील.

**०४**. तारण शुल्क आकारणी करताना द्यावयाच्या परवानगी आदेशातील अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील:-

*(अ) शासकीय/ नझूल जमिनी व त्या वरील संबंधित इमारतीतील सदनिका/गाळा तारण ठेऊन कर्ज उभारण्यास परवानगी देताना उक्त परिच्छेद क्र.०१ मधील तक्त्यानुसार अनुज्ञेय असणारे "तारण शुल्क" शासनाकडे आगाऊ भरणे आवश्यक असेल. तारण शुल्क वसुल केल्यानंतर परवानगी आदेश पारित करताना ज्या रकमेच्या कर्ज उभारणीसाठी तारण शुल्क वसुल करुन परवानगी देण्यात आली आहे, तेवढ्या कर्ज रकमेपुरतेच हे आदेश वैध ठरतील.*

*(ब) कर्जदार व्यक्ती/संस्था यांनी वरीलप्रमाणे शासकीय/नझूल जमिनी व त्या संबंधित इमारतीमधील सदनिका/गाळा तारण ठेवून घेतलेल्या कर्जाची परतफेड केली नाही तर, त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या व्यक्ती/संस्था यांची राहील. विशिष्ट प्रकरणात तारण ठेवलेली सदनिका/गाळा कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थेकडे हस्तांतरण करण्याची परिस्थिती उद्भवल्यास व त्यानुषंगाने, अशा जमिनी व सदनिका/गाळा संबंधित वित्तीय संस्थेकडून किंवा सदनिका/गाळा धारकाकडून विक्री/लिलाव होत असल्यास, त्यासाठी संबंधित व्यक्ती/संस्था यांनी किंवा यथास्थिती वित्तीय संस्थेने शासनाकडे विहीत हस्तांतरण शुल्काचा भरणा करणे आवश्यक राहील. शासकीय/नझूल जमिनी व सदनिका/गाळा तारण ठेवावयाच्या बँकेने/वित्तीय संस्थेने त्यांच्या कर्जफेडीच्या रकमेची पूर्तता करण्याकरीता जर भविष्यात सदर जमिनी, गाळा, गाळयाचा भाग/सदनिका, सदनिकेचा कोणताही भाग विक्रीस काढला तर संबंधित बँक/वित्तीय संस्था यांना देय असलेली रक्कम आणि सदर जमिनी, गाळा/सदनिका यांची अपेक्षित किंमत याचा तपशील देऊन जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य राहील आणि अशी पूर्वपरवानगी मिळाल्यानंतर विक्री करण्यात येणाऱ्या जमिनी, सदनिका/गाळा यांच्या विक्रीपोटी बँकेस/वित्तीय संस्थेला मिळणा-या रकमेतून बँक/वित्तीय संस्थेने पहिला भार म्हणून शासनास पुढील रकमा देणे अनिवार्य राहील :-*

*(१) शासकीय / नझूल जमिनी व त्या वरील इमारतीमधील सदनिका/गाळा विक्री होत असेल, त्यावेळी या सदनिका/गाळा यांच्या बाबतीत प्रचलित धोरणानुसार शासनास देय होईल इतकी "हस्तांतरण- फी" (या प्रसंगी अनर्जित रक्कम आकारण्यात येणार नाही).*

*(२) शासकीय/नझूल जमिनी व त्या वरील इमारतीमधील सदनिका/गाळा यांच्याबाबतीत शासनास देय असतील अशा इतर कोणत्याही देय रकमा.*

*(क) थकीत कर्जापोटी विक्रीने हस्तांतरीत होणा-या शासकीय/नझूल जमिनी व सदनिका/गाळा ज्या जमिनीवर आहेत, ती जमीन भोगवटादार वर्ग-२ किंवा यथास्थिती शासकीय भाडेपट्टा या धारणाधिकाराचीच राहील.*

०५. *अधिनियमातील तरतुदींनुसार, पूर्वी संहितेमध्ये तारण शुल्काच्या आकारणीसाठी किंवा वसुलीसाठी स्वतंत्र तरतूद नव्हती, या एकमेव कारणावरून कोणत्याही न्यायालयात, न्यायाधिकरणात किंवा प्राधिकरणासमोर कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. तसेच दि. २७ फेब्रुवारी २००९ पासून वसूल केलेल्या कोणत्याही तारण शुल्काच्या परताव्यासाठी* (Refund) *कोणताही दावा किंवा खटला चालविला जाणार नाही. सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी याची नोंद घेऊन यापूर्वीच्या न्यायालयीन आदेशांच्या अधीन राहून परताव्याची कोणतीही नवीन कार्यवाही करू नये.*

*न्यायालयीन किंवा अर्ध-न्यायालयीन स्तरावर तारण शुल्क आकारणी किंवा परताव्याबाबत प्रलंबित असलेल्या सर्व प्रकरणांमध्ये संबंधित शासकीय वकिलांच्या निदर्शनास 'सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२' आणून देऊन सदर प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर पावले उचलण्यात यावीत.*

**०६.** सदर शासन परिपत्रक वित्त विभागाच्या अनौसं.क्र.५४६/२०२६/व्यय-९,दि.२८.०९.२०२६ अन्वये प्राप्त सहमतीद्वारे निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६१०१९१२२५२६८८४८ असा आहे, हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MOHASIN RAJMAHMAD SHAIKH

Digitally signed by MOHASIN RAJMAHMAD SHAIKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=613D5F4E81161C3485310241B06DD6CE7372AD8BAF95F5AE576D53AC61AFE62B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=74CDE6704F3FD0A42314F2424B55F3CFA18AE8A657DC2FC61B51901A90B029D5, cn=MOHASIN RAJMAHMAD SHAIKH
Date: 2026.10.19 12:28:46 +05'30'

**(मोहसिन रा. शेख )**
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री, नगर विकास यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उप मुख्यमंत्री, क्रिडा व राज्य उत्पादन शुल्क यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सर्व विभागीय आयुक्त/उपायुक्त (महसूल) विभागीय आयुक्तांचे कार्यालय
१२) महालेखापरिक्षक (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर/मुंबई
१३) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) सर्व जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी/निवासी उपजिल्हाधिकारी.
१५) उप सचिव (ज-१) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मुंबई
१६) सर्व सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) निवडनस्ती (जमीन-०१)